म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय सा.वा.
दा.क्र. 92७८



## कांहींतरी नवेंच करा!

BVBK-0401247
BVBK-0401247

# तेजस्वी धर्मोद्धारक

# तेजस्वी धर्मोद्धारक

कांहीं तरी नवेच करा : ३३

रामचंद्र चिंतामण ढेरे

म. सं. सं. कर्वे, वाचनालय शाखा.
[illegible]
क्र. १२७८ दि० २०।५।६१
विषय बा. वा.

BVBK-0401247

पन्नास नये पैसे

वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
मुंबई २.

श्री : २०१

✠

© : १९६०
वोरा अ‍ॅण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

✠

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ,
वोरा अ‍ॅण्ड कंपनी
पब्लि. प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता,
मुंबई २.

✠

आवृत्ति पहिली : १९५९
आवृत्ति दुसरी : १९६४

✠

मूल्य ५० नये पैसे

✠

मुद्रक :
अनंत जे. शाह
लिपिका प्रेस, कुर्ला रोड,
अंधेरी, मुंबई ५९.



भारताच्या इतिहासांत श्रीशंकराचार्यांचें नांव अजरामर झालें आहे. बौद्ध धर्माच्या ऱ्हासकाळांत भारताचें धर्मजीवन अत्यंत विकृत बनलें होतें. धर्माच्या नांवाखालीं निरनिराळे संप्रदाय अधर्माचा प्रचार करीत होते. मतामतांचा गलबला माजला होता. अशा आणीबाणीच्या परिस्थितींत इसवी सनाच्या आठव्या शतकांत श्रीशंकराचार्य अवतरले आणि त्यांनीं आपल्या अतुल बुद्धिमत्तेनें आणि अचाट कर्तृत्वानें भारतीय धर्मजीवन उन्नत बनविलें. केवळ बत्तीस वर्षांच्या आयुर्मर्यादेंत त्यांनीं केलेलें धर्मोद्धाराचें कार्य अलौकिक आहे ! त्या युगपुरुषाचें हें ओझरतें दर्शन.

# तेजस्वी धर्मोद्धारक श्रीशंकराचार्य

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

## १ : "मला संन्यास घ्यायचाय् !"

त्या कुमारानें नर्मदेच्या तीरावर एका आश्रमांत प्रवेश केला. तो आश्रम गोविंदयतींचा होता. आश्रमाच्या परिसरांतील रमणीय वातावरणाचा अनुभव घेत तो कुमार गोविंदयतींच्या कुटिरांत शिरला आणि त्यानें त्यांना साष्टांग प्रणिपात केला.

"कुमार, तूं कोठून आलास ?"

"मी केरळ देशांतून आलोंय्. माझं नांव शंकर. मी आईची अनुज्ञा घेऊन आलोंय्—मला संन्यास घ्यायचाय् !"

बारा-तेरा वर्षांच्या त्या अल्पवयी कुमाराचें उत्तर ऐकून गोविंदयति चकित झाले. त्याची सतेज अंगकांति, त्याच्या गात्रांतली कोवळीक, त्याची तेजस्वी मुद्रा आणि निश्चयाची व ज्ञानाची झळाळी असलेली त्याची वेधक दृष्टि हें पाहून गोविंदयतींनीं तत्काळ जाणलें कीं, हा कुमार सामान्य नव्हे. बारा-तेरा वर्षांचा तो कुमार केरळदेशांतून नर्मदातीरापर्यंत वाट तुडवीत आला आहे आणि तो संन्यास घेण्याची इच्छा व्यक्त करीत आहे, ही घटनाच मुळीं त्याच्या अलौकिक गुणांची साक्ष देत होती. गोविंदयतींच्या हृदयांत त्याच्याविषयीं क्षणांत वात्सल्य निर्माण झालें. त्यांनीं त्याच्या पाठीवरून प्रेमानें हात फिरविला आणि ते म्हणाले—

"बाळ, एवढ्या अल्पवयांत संन्यास घ्यायचा नसतो. या वयांत गुरुगृहीं अध्ययन करायचं, पुढें लग्न करून गृहस्थाश्रम स्वीकारायचा आणि मग गृहस्थधर्मांतील सर्व कर्तव्यं पार पाडल्यावर हळूहळू संन्यासाची तयारी करायची असते."

"गुरुदेव, माझं अध्ययन झालं आहे—आणि गृहस्थाश्रम स्वीकारण्याची मला इच्छा नाहीं. माझं ध्येय माझी वाट पाहत आहे, मला निःसंग बनून ध्येयाची कांस धरली पहिजे."

"कोणतं तें ध्येय ?"

"धर्मोद्धाराचं ! अधर्मानं ग्रासलेल्या धर्माला मुक्त करण्यासाठीं माझ्यासारख्या युवक संन्याशाची गरज आहे. मी संन्यास घेतलाच पाहिजे !"

त्याचा हेतु, त्याची आकांक्षा, त्याच्या कर्तृत्वाची झेप त्याच्या शब्दाशब्दांतून व्यक्त होत होती. गोविंदयतींनीं त्याच्याकडे कौतुकानें पाहिलें आणि ते त्याला म्हणाले—

"बाळ तुझा हेतु माझ्या ध्यानांत आला. मी तुला संन्यास देतों."

त्यांच्या या आश्वासक शब्दांनीं तो कुमार हर्षोत्फुल्ल झाला. त्यानें आवेगानें गोविंदयतींचे चरण धरले आणि तो कृतज्ञ भावनेनें अस्फुट स्वरांत उद्गारला,

"गुरुदेव ! मी कृतार्थ झालों..."

त्याच्या ओलावलेल्या दृष्टींत आनंदाबरोबरच आत्मविश्वास झळाळत होता.

बाराव्या वर्षी संन्यास घेणारा हा कुमार म्हणजेच श्रीमत् शंकराचार्य. त्यांचा जन्म इ. स. ७८० च्या सुमारास केरळ देशांत कालदी या गांवीं झाला. त्यांच्या पित्याचें नांव शिवगुरु आणि मातेचें नांव आर्याम्बा. शिवगुरु हे विद्याधिराज नामक पंडिताचे पुत्र. आपल्या पित्याप्रमाणेंच तेहि विद्या-निपुण होते. त्यांच्या हृदयांत शिवभक्ति उत्कटतेनें नांदत होती. त्यांना शंकराच्या प्रसादानें उत्तर आयुष्यांत जो मुलगा झाला तोच हा शंकर.

शंकराच्या जन्मामुळें शिवगुरूंना अपार आनंद झाला. ते प्रेमळ, सत्प्रवृत्त आणि विद्याप्रेमी होते. आपल्या मुलाला खूप शिकवायचें आणि त्याला महान पंडित बनवायचें, अशीं स्वप्नें त्यांच्या मनांत तरळूं लागलीं. परंतु दुर्दैवानें त्या स्वप्नांना फुलू-फळूं दिलें नाहीं. आपल्या मुलाचें उपनयन करण्यापूर्वींच शिवगुरु हें जग सोडून गेले आणि पित्याच्या छत्राला आंचवलेल्या शंकराला सांभाळण्याची जबाबदारी विधवा आर्याम्बेवर पडली.

आर्याम्बेनें आपलें दुःख आंतल्या आंत दाबलें आणि ती शंकराच्या शिक्षणाची चिंता करूं लागली. त्याच्याविषयींच्या त्याच्या पित्याच्या इच्छा-आकांक्षा कशा पुऱ्या करायच्या याचाच ती विचार करूं लागली. शेवटीं तिनें मनाचा निग्रह केला आणि पांच वर्षांच्या त्या कोंवळ्या मुलाला गुरुगृहीं पाठविलें. अगोदरच वैधव्यानें हृदय पोळलेलें आणि त्यांत आपल्या एकुलत्या एका कोंवळ्या मुलाला आपल्यापासून दूर लोटायचें, आर्याम्बेला या वेळीं किती

वेदना झाल्या असतील ! परंतु गुरुगृहीं पाठवण्यांतच शंकराचें हित आहे आणि त्याच्या विकासांतच आपल्या आईपणाचें सार्थक आहे, हें त्या थोर मातेनें जाणलें होतें. त्याचमुळें आपल्या दुःखांचा, आपल्या भावनांचा विचार न करतां, डोळ्यांतील अश्रु पुसून तिनें शंकराला भरल्या हृदयानें निरोप दिला.

नुकतेंच उपनयन झालेला शंकर गुरुगृहीं जायला निघाला. त्याचें वय पांच-सहा वर्षांचेंच होतें, पण आपल्या आईच्या डोळ्यांतील अश्रूंचा सारा अर्थ त्याला समजत होता. आपण आपल्या पित्याच्या आकांक्षा पुऱ्या करायला हव्यात, खूप ज्ञान मिळवायला हवें आणि त्या ज्ञानाच्या साहाय्यानें अज्ञानावर हल्ला चढवायला हवा, ही अस्पष्टशी जाणीव घेऊनच त्यानें पाठशाळेंत पाऊल ठेवलें.

त्याची विनयी वृत्ति, त्याची ज्ञानग्रहणाची शक्ति, त्याची गुरूंवरील भक्ति आणि सहाध्यायी विद्यार्थ्यांविषयींची त्याची बंधुभावना यामुळें तो गुरुगृहीं सर्वांचा लाडका बनला. गुरुपत्नीनें तर त्याला आपल्या मुलाहूनहि अधिक लळा लावला. या अनुकूल वातावरणांत शंकराचें शिक्षण वेगानें होऊं लागलें. गुरूनें दिलेला पाठ तो क्षणांत आत्मसात् करीत असे आणि त्या पाठावर मनोमन चिंतन करून, तो पुढील पाठाचें वातावरण अगोदरच तयार ठेवीत असे. थोड्याच अवधींत त्याचें वेदाध्ययन पूर्ण झालें. वेदग्रंथांतील गूढार्थाचें रहस्य, ब्राह्मण ग्रंथांतील आचारविचारांचें विवेचन, उपनिषदांतील सखोल तत्त्वज्ञान—हें सर्व त्यानें हळूहळू पचविलें. त्याची प्रज्ञा जणूं बृहस्पतीसारखी

होती-जणुं साक्षात् सरस्वती त्याच्या ठायीं नांदत होती. त्याच्या कुशाग्र बुद्धीनें, ज्ञाननिष्ठेनें आणि विनयशील वृत्तीनें त्याचे गुरु भारावून गेले. वयाच्या बाराव्या वर्षा-पर्यंत त्यानें आपली एवढी प्रगति केली कीं, त्याच्या शंकां-पुढें प्रत्यक्ष त्याचे गुरुहि निरुत्तर बनत. हा कुमार आपल्या स्वयंप्रज्ञेनें चमकणार आणि आपल्या कर्तृत्वानें कांहीं तरी असामान्य कार्य करून दाखविणार, याची खात्री त्याच्या गुरूंना वाटूं लागली. त्यांना तर असें राहून राहून वाटे कीं, हा मानव नव्हेच-हा साक्षात् शंकरच देह धारण करून पृथ्वीवर अवतरला आहे आणि आपल्या पूर्वपुण्याईमुळें त्याचा सहवास आपणांला लाभत आहे. या जाणिवेमुळें शंकराच्या गुरूंनीं त्याला पाठशाळेंतील विद्यार्थ्यांना वेद-शिक्षण द्यावयास सांगितलें. विद्यार्थी शंकर बाराव्या वर्षींच आचार्य शंकर बनला !

## ३ : "धर्माला तारील कोण ?"

गुरुगृहीं अध्ययन आणि अध्यापन करीत असतांना शंकराच्या मनांत विचारांची नवी खळबळ सुरू झाली. गुरुगृहीं राहत असतांना अनेक पंडित तेथें येत, चर्चा करीत, आपापलीं मतें व अनुभव सांगत. निरनिराळीं तीर्थें हिंडून आलेले जाणते यात्रिक जेव्हां भेटत, तेव्हां त्यांच्या मुखांतून भारतांतील धर्मस्थितीचें चित्र स्पष्ट होत असे.

या वेळीं हिंदुस्थानांत धार्मिक क्षेत्रांत अराजक माजलें होतें. इसवी सनाच्या सातव्या शतकांत होऊन गेलेल्या सम्राट् हर्षवर्धनानें बौद्ध धर्मास सर्वतोपरी उत्तेजन दिल्यामुळें बौद्धधर्मीयांचें प्रस्थ खूपच वाढलें होतें. परंतु

त्यांचें धर्माचरण मात्र बिघडूं लागलें होतें. भगवान् बुद्धाच्या महानिर्वाणानंतर कांहीं काळानें त्याच्या अनुयायांत त्याच्या उपदेशासंबंधीं जे मतभेद सुरू झाले होते, त्या मतभेदांतून आठव्या शतकापर्यंत अनेक मतमतांतरें निर्माण झालीं होतीं. भगवान् बुद्धाची आत्यंतिक करुणा आणि जनहितासाठीं त्यानें सदाचारावर दिलेला भर यांचा मागमूसहि उरला नव्हता. तात्त्विक मतभेद आणि शाब्दिक तर्कटें लढवून निरनिराळे बौद्ध उपपंथ परस्परांशीं झगडत होते. विहारांत राहणारे भिक्षूंचे आणि भिक्षुणींचे समूह धर्माच्या आवरणाखालीं अधर्माचार आचरीत होते. वज्रयान आणि सहजयान या नांवाच्या दोन बौद्ध संप्रदायांच्या अनुयायांनीं तर उघड उघड अनाचाराचें स्तोम माजविलें होते आणि अनाचारालाच धर्माची प्रतिष्ठा मिळवून दिली होती. या दोन बौद्ध संप्रदायांप्रमाणेंच हिंदुधर्माच्या पठडींत शाक्त, कापालिक, कौलिक, पाशुपत, इत्यादि अनेक पंथोपपंथ अत्यंत विकृत आचारांत गर्क झालेले होते. मद्यमांसाचें सेवन, स्त्रियांबरोबर व्यभिचार, देवतांना मनुष्यबळीं देणें, आणि असेच माणसांनीं आचरूं नयेत अशा स्वरूपाचे किळसवाणें आचार या धर्मसंप्रयादांत रूढ होते.

आश्चर्य असें कीं, हें सर्व धर्माच्या नांवाखालीं चाललें होतें. वैदिक परंपरेंतले पंडित वेदांच्या अभ्यासांत आणि वैदिक कर्मकांडांत गर्क होते. त्यांना भोंवतालच्या अनिष्ट परिस्थितीचें भान नव्हतें. त्या परिस्थितीकडे डोळेझांक करून त्यांचीं नित्यकर्में चालू होतीं. अशा अवस्थेंत बहुजनांना शुद्ध धर्माची वाट दाखवणारा कोणीहि उरला

नव्हता. सर्वत्र मतमतांतरें, वाद-विवाद, धर्माधर्मांचा सांवळा गोंधळ ! लोकांनीं कुणाकडे पहायचें ? कुणाला वाट पुसायची ? कुणाच्या पावलांवर पाऊल टाकून जीवनाचा मार्ग आक्रमायचा ?

हिंदुधर्माच्या कल्पनेप्रमाणें अशी परिस्थिति निर्माण झाली म्हणजे परमेश्वर अवतार घेतो. विपरीत स्थितींत गुदमरणारा युगाचा आत्मा जणुं क्रांतीसाठीं महापुरुषाला निमंत्रण देतो आणि त्या युगाच्या आक्रोशाला साद देत महापुरुषाचा अवतार घडतो. जगाच्या इतिहासांत अशा आणीबाणीच्या क्षणीं कुणी तरी महापुरुष अवतरल्याचीं उदाहरणें सर्वत्र आढळतात. गीतेंत भगवान् श्रीकृष्णानें स्वमुखानें ग्वाही दिली आहे कीं—

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ।।

[ जेव्हां जेव्हां धर्माला ग्लानि येते आणि अधर्माचें प्रस्थ माजतें, तेव्हां तेव्हां प्रत्येक युगांत, साधु-सज्जनांच्या रक्षणासाठीं आणि दुराचारी जनांच्या विनाशासाठीं मी जन्म घेत असतों. ]

या तत्वानुसार, जेव्हां धर्माची अवनति होते, दुर्जनांचें प्राबल्य वाढतें आणि बहुजनांचें जीवन अंधारून जातें, तेव्हां कोणी तरी ईश्वरी सामर्थ्याचा महापुरुष अवतरतो. त्याच्या तेजानें भोंवतींचा अंधार दूर होतो. त्याच्या पराक्रमानें दुर्जनांचें दमन होतें. त्याच्या समर्थ व्यक्तिमत्त्वाच्या

छत्राखालीं साधुसज्जनांना आसरा मिळतो आणि त्याच्या आचार-विचारांच्या पायावर पुनः धर्माचें मंदिर वैभवानें उभें राहतें. प्रचलित परिस्थितींतील सर्व विकृति नष्ट करून आणि धर्माची घडी नीट बसवून आपली छाप जन-मनावर बसविणारा असा अलौकिक पुरुष लोकांच्या दृष्टीनें 'परमेश्वराचा अवतार' न ठरला तरच नवल !

गुरूच्या पाठशाळेंत शिकवीत असतांना शंकरानें ही सर्व परिस्थिति समजाऊन घेतली आणि तो परिस्थिति दूर करण्यासाठीं स्वतः पुढें व्हायचें, असा निर्णय मनाशीं ठरविला. एक बारा वर्षांचा कुमार जेव्हां अखिल भारताचें धर्मजीवन शुद्ध करण्याच्या विराट् कार्याचा संकल्प सोडतो, तेव्हांच त्याच्या अलौकिक सामर्थ्याची साक्ष पटते. परिस्थितो-च्या क्षितिजावर एका नव्या महापुरुषाचा उदय होत आहे, याची ग्वाहीच त्या संकल्पांत होती.

वास्तविक शंकरासारखा बुद्धिमान् कुमार जर रूढ मार्गच चोखाळीत राहिला असता, तर त्याला कमी यश मिळालें असतें, असें नाहीं. तो ज्या शाळेंत शिकत होता, तेथील आचार्यांनीं त्याचें बुद्धिवैभव ओळखलें होतें. एक महापंडित म्हणून त्याची ख्याति वाढायला फारसा उशीर नव्हता. देशोदेशींचे विद्यार्थी त्याच्या चरणांशीं वेदविद्येचे पाठ घ्यायला आले असते; निरनिराळ्या ज्ञानशाखांतील पंडितांनीं त्याचें श्रेष्ठत्व मानलें असतें; राजे-रजवाड्यांनीं त्याच्यावर वैभवाचा वर्षाव केला असता आणि कीर्तीच्या नि वैभवाच्या शिखरावर नांदत असतांना त्याला कांहींहि उणें पडलें नसतें. परंतु शंकर त्या चाकोरींतला नव्हता.

त्याला केवळ पंडित्याचा विजय नको होता, वैभव नको होतें. अधर्माच्या मगरमिठींत गुदमरणाऱ्या धर्माची हांक त्याच्या हृदयापर्यंत भिडली होती आणि धर्माला तारण्यासाठीं सारें आयुष्य वेंचण्याचा निर्णय त्यानें घेतला होता.

## ४ : तेजस्वी संन्यासी

गृहस्थाश्रम न स्वीकारतां एकदम संन्यास-दीक्षा घ्यायची आणि भारतभर संचार करून धर्माचें शुद्धीकरण करायचें, हें आतां शंकाराचें ध्येय बनलें. परंतु यासाठीं आईची अनुज्ञा हवी. पित्याच्या मृत्यूनंतर आईनें स्वतःचें दुःख विसरून त्याला संभाळलें आणि योग्य गुरूच्या स्वाधीन करून त्याचें शिक्षण पूर्ण केलें. आईविषयीं शंकराच्या मनांत नितांत आदरभाव वसत होता. मुलानें ज्ञान मिळवावें, महापंडित बनावें आणि पित्याच्या आत्म्याचें समाधान करावें, ही त्या माउलीची इच्छा. म्हणून तर तिनें मन घट्ट करून त्याला गुरुगृहीं पाठविलें होतें. परंतु संन्यास घ्यायला ती अनुज्ञा कशी देईल ? आतां आपल्या मुलानें लग्न करावें, घरीं अग्निहोत्र सुरू करावें आणि पाठशाळेंत ज्ञानाचें सत्र उघडावें, हें ठीक. तिच्या वैधव्यानें गांजलेल्या हृदयांत मुलाच्या सुखी संसाराचीं स्वप्नें केव्हांपासूनच फुलत होतीं. त्या माउलीला आपल्या मुलाच्या त्या जगावेगळ्या संकल्पाची कल्पनाच नव्हती.

शंकरानें आईला आपला हेतु सांगितला. आधींच दुःखांनीं व्यापलेली ती माउली. आपला एकुलता एक मुलगा संन्यास घेणार, या कल्पनेनें तिला विलक्षण धक्का बसला.

"बाळ, तूं मला सोडून जाणार ?" तिनें कळवळून विचारलें.

आईच्या स्वरांतला कंप आणि डोळ्यांतलें पाणी पाहून शंकराचें हृदय गहिंवरून आलें. परंतु त्याचा निश्चय मात्र विरघळला नाहीं. तो आईला म्हणाला–

"आई, तुझ्या मुलानं संन्यास घेतला नाहीं, तर बुडत्या धर्माला तारील कोण ? सारीकडे भ्रष्टाचार मातलाय् आणि सारे धर्मपंडित मात्र आपापसांत शब्दांचा काथ्याकूट करीत बसलेत. कर्तव्याचं कुणाला भान नाहीं. मग जें करायला हवं अन् ज्यासाठीं कुणीच पुढें होत नाहीं, तें करायला आपला मुलगा पुढें होत आहे, यांत तुझा गौरवच नाहीं का ?"

"खरं रे बाळ ! हें तुझं ज्ञान समजतं, पण उमजत नाहीं. तुझ्या गौरवांतच माझा गौरव आहे. पण आईची वेडी माया–"

बोलतां बोलतां आर्याम्बेचा कंठ रुद्ध झाला. तिच्या डोळ्यांतून अश्रु झरूं लागले. तिनें शंकराला जवळ घेतलें आणि त्याच्या पाठीवरून हळुवारपणें हात फिरवला. शंकर आईच्या अश्रूंनीं भिजून गेला. त्या थोर माउलीच्या हृदयांतील पवित्र जळाच्या अभिषेकांत शंकराच्या भावी यशाची ग्वाहीच होती.

* * *

आईची अनुज्ञा घेऊन बारा वर्षांच्या शंकरानें घर सोडलें आणि तीर्थक्षेत्रें हिंडत हिंडत तो केरळभूमींतून उत्तरेकडे निघाला. वाटेंत तो धर्मक्षेत्रांची पहाणी करायचा,

पंडितांशीं चर्चा करायचा, धार्मिकांचें आचार न्याहाळायचा आणि आपल्या वृत्ति-प्रवृत्तींना अनुकूल असा कुणी मार्गदर्शक भेटतोय् का, याचा शोध घ्यायचा. वाटेंत त्याला असें समजलें कीं, नर्मदेच्या कांठीं गोविंदयती नामक एक महान् संन्यासी आश्रम बांधून राहत आहेत. त्यांचा ज्ञानाधिकार आणि त्यांचें विशाल हृदय यांविषयींची कीर्ति त्याच्या कानीं आली. त्यांचें वर्णन ऐकल्यावर शंकराला त्यांच्याविषयीं मनोमन आदर वाटूं लागला आणि त्यांचें दर्शन घेण्यासाठीं तो तांतडीनें नर्मदा-तीरीं गेला.

गोविंदयतींची तेजस्वी मूर्ति, त्यांचें अगाध ज्ञान, त्यांची उदार वृत्ति आणि धर्माविषयींची त्यांची शुद्ध दृष्टि यांचा शंकराच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. तसेंच शंकराच्या बालमूर्तींतील विलक्षण तडफ त्या वृद्ध योग्याला तत्काळ जाणवली. पहिल्या भेटींतच त्यांचें मनोमीलन झालें आणि गोविंदयतींनीं शंकराचा स्वीकार केला. गोविंदयतींनीं शंकराला संन्यास-दीक्षा दिली आणि त्यास 'शंकराचार्य' असें अभिधान प्राप्त झालें.

सद्गुरूंच्या सानिध्यांत शंकराच्या—नव्हे शंकराचार्यांच्या ज्ञानाला नवा उजळा मिळाला. गुरुदेवांच्या सूक्ष्म मार्गदर्शनानुसार त्यांनीं आपल्या भावी कार्याची नीट आंखणी केली. कांहीं काळ गुरुसहवासांत घालविल्यावर गुरूंची अनुज्ञा घेऊन त्यांनीं नर्मदातीर सोडलें आणि काशीची वाट धरली. वैदिक धर्माच्या परंपरेंत शिरलेला अनिष्ट भाग नष्ट करून आणि धर्माच्या नांवाखालीं अधर्माचार करणाऱ्या नानाविध पंथांचें उन्मूलन करून

शुद्ध वैदिक धर्माचें तेज वाढविणें, हें आतां शंकराचार्यांचें ध्येय निश्चित झालें होतें. काशीच्या मार्गावर वाटचाल करतांना त्यांनीं गांवोगांवच्या अनेक पंडितांना आपले विचार पटवून दिले.

काशी हें पंडितांचें आगर. नानाविध मतांचें, प्रवृत्तींचे आणि संप्रदायांचे पंडित काशींत राहत असत. काशींतील विद्याकेंद्रांत शिक्षण घ्यायला मिळावें, म्हणून भारताच्या सर्व भागांतून बुद्धिमान् विद्यार्थी काशीकडे धांव घेत. काशींतील पंडितांची मान्यता मिळावी म्हणून दूरदूरचे विद्वान् ग्रंथकार आपले ग्रंथ पारखून घेण्यासाठीं काशींत येत. विविध शाखांतील ज्ञानाची देवाण-घेवाण करणारी नगरी म्हणून काशीची सर्वत्र ख्याति होती. जें काशींत मान्य झालें, काशींत प्रतिष्ठा पावलें, तें उभ्या भारतानें शिरीं धारण करावें, एवढा काशींतील पंडितांचा अधिकार !

शंकराचार्य काशींत आले. या तरुण संन्याशाला गंगातीरावर पाहून कांहीं गर्विष्ठांनीं त्याला छेडलें. परंतु शंकराचार्य हे कांहीं कच्च्या गुरूचे निर्बुद्ध शिष्य नव्हते. त्यांनीं पहिल्याच फेरींत त्या गर्विष्ठ पंडितांना आपली चुणूक दाखविली. त्यामुळें सबंध काशींत वार्ता पसरलीं कीं—

एक कुमार संन्यासी गंगातीरावर उतरला आहे. तो पंडित असून भल्या भल्या पंडितांना वादांत जिंकणारा आहे. त्याच्या वादकौशल्यापुढें आजवर अनेकांनीं मान तुकविली आहे."

ही वार्ता काशीच्या पंडितांना झोंबणारी होती.

"वा: ! म्हणे महापंडित आलाय्–"

"अहो, एवढासा पोरगा—तो कसला वाद करतोय ?"

"याला एवढ्या लहान वयांत संन्यास तरी कोणत्या मूर्खानं दिला ?"

"पण गर्विष्ठ दिसतोय्. एकदां त्याचा ताठा उतरवलाच पाहिजे !"

काशींतील पंडितांत अशी खळबळ माजली. अनेक मोठमोठे पंडित शंकराचार्यांच्या निवासाकडे निघाले. कुणाच्या मनांत कुतूहल होतें, कुणाच्या मनांत उपहास होता, तर कुणाच्या मनांत कांहींसा भीतीचा अंशहि होता. आचार्य गंगातीरीं चिंतनांत मग्न होते. काशींत प्रवेश केल्यापासून त्यांना जे अनुभव आले, त्यामुळें त्यांचें मन चिंताग्रस्त झालें होतें. काशी म्हणजे भारताचें धर्महृदय ! या नगरांतील धर्मधुरीणांनीं धर्माचें रक्षण करावें, लोकांना शुद्ध धर्माचें ज्ञान द्यावें आणि सदैव अज्ञान-निरसनासाठीं तत्पर असावें. पण परिस्थिति विपरीत होती. जो तो गर्वानें फुगलेला, कर्मकांडांत गुंगलेला आणि कर्तव्याचें भान नसलेला. शब्दांचे फवारे उडवून आपापली श्रेष्ठता सिद्ध करणें, हेंच सर्व पंडितांचें उद्दिष्ट. कुणी खोलवर विचार करायला तयार नव्हता. या साऱ्या वाट चुकलेल्या पंडितांना योग्य मार्गावर कसें आणायचें, हा आचार्यांपुढें प्रश्न होता. शिवाय ते सर्व अहंकारानें मस्त झालेले असल्यामुळें सौजन्यानें एकत्र बसून सर्व परिस्थिति समजावून घेतील आणि योग्य मार्ग पत्करतील, हें शक्य नव्हतें. त्यांना आपल्या विचारांची दीक्षा देण्यासाठीं एकच

मार्ग होता. तो म्हणजे त्यांना वादांत जिकणें-त्यांचा ज्ञानाचा अहंकार उतरविणें.

थोडयाच वेळांत आचार्यांभोंवतीं काशींतील पंडितांची दाटी जमली. आचार्यांनीं सहर्ष मुद्रेनें सर्वांचें स्वागत केलें. ते सर्वांशीं अत्यंत विनयानें बोलत होते. परंतु आचार्यांच्या सौजन्याकडे दुर्लक्ष करून एकेकानें त्यांना आडवे-तिडवे प्रश्न विचारून छेडण्यास प्रारंभ केला. आचार्य गांगरले नाहींत–दबले नाहींत. त्यांनीं अत्यंत शांतपणानें, कौशल्यानें आणि मार्मिकपणानें सर्वांच्या प्रश्नांना उत्तरें दिलीं. हळूहळू पंडित निरुत्तर होऊं लागले. आचार्यांच्या प्रकांड अध्ययनानें आणि स्वयंभू बुद्धिमत्तेनें मोठमोठें पंडित दिङ्-मूढ झाले. जे परीक्षा घ्यायला आले होते, त्यांचीच परीक्षा झाली. जे फजिती करायला आले होते, तेच फजीत झाले. जे शिकवायला आले होते, ते स्वतःच शिकून जाऊं लागले. आचार्यांच्या ज्ञानाचा नि व्यक्तिमत्त्वाचा ठसा अनेकांच्या मनांवर उमटूं लागला.

आचार्य कांहीं वर्षें काशींत राहिले. त्यांचा कीर्तिसुगंध साऱ्या काशी क्षेत्रांत दरवळूं लागला. त्यांनीं अनेक स्त्री-पुरुषांना, तरुणांना नि वृद्धांना, रावांना नि रंकांना, शिक्षितांना नि अशिक्षितांना बोध केला. त्यांनीं लोक-मनाची एवढी पकड घेतली कीं, शंकराचार्यच आपणांस योग्य तो मार्ग दाखवूं शकतील, अशी लोकांची दृढ श्रद्धा बनली. ते अत्यंत तरुण होते, अत्यंत देखणे होते. त्यांच्या मूळच्याच तेजस्वी मूर्तीवर ज्ञानाचें, तपाचें आणि ध्येय-निष्ठेचें आगळें तेज झळाळत होतें. जो जो त्यांना भेटा-

यला येई, तो तो पहिल्या भेटींतच त्यांचा शिष्य होऊन जाई. त्यांचें बोलणें इतकें मधुर, चतुर आणि ज्ञानमय असें कीं, श्रोत्यांच्या तनामनाला कान फुटत. त्यांचा सहवास इतका संजीवक होता कीं, तो ज्याला लाभे, तो स्वतःस अत्यंत भाग्यवंत मानीत असे. अनेक वृद्ध पंडित या कुमार संन्याशाच्या चरणीं माथा नमवीत असत. एखाद्या देव-दूतासारखें व्यक्तिमत्त्व लाभलेला हा कुमार संन्यासी काशीच्या रस्त्यानें चालूं लागला कीं, काशीवासी जन पावलोपावलीं त्याला प्रणाम करीत.

काशी-निवासांतच आचार्यांना सनन्दन नामक शिष्य लाभला. त्याशिवाय आणखी अनेकांनीं त्यांचें शिष्यत्व पत्करलें. काशी-वासी पंडितांचीं हृदयें जिकल्यामुळें आपो-आपच आचार्यांची कीर्ति साऱ्या भारतांत पसरली. त्यांच्या ज्ञानाचा लाभ घेण्यासाठीं दूरवरून लोकांची रीघ लागली. त्यांना कुणाकडून कशाचीच अपेक्षा नव्हती. धनद्रव्याची, गौरवाची, अधिकाराची अपेक्षा त्यांनीं कधींच केली नाहीं. "करतलभिक्षा, तरुतलवासः" हा त्यांचा बाणा होता. परंतु त्यांची योग्यताच एवढी होती कीं, नको म्हणत अस-तांनाहि कीर्ति त्यांच्या पायाशीं लोळण घेऊं लागली. त्यांच्या अखंड ज्ञानदानाच्या व्रतांतून आपोआपच गुरुत्व त्यांना लाभलें. अज्ञानाचें निरसन करणें, योग्य विचार करण्याची दिशा दाखविणें आणि जीवनांत शांति व समाधान प्राप्त करण्याचा उपाय सांगणें—हेंच आचार्यांचें उद्दिष्ट होतें आणि त्या उद्दिष्टानुसार कार्य करीत राहण्यांतच त्यांना आनंद लाभत होता.

## ५ : मंडनमिश्राच्या घरीं

काशींतील निवासांत आचार्यांनीं अनेक विद्वानांना वादांत जिंकलें होतें. पराभूत झालेल्या सर्वांनीं त्यांचें शिष्यत्वहि पत्करलें होतें. त्यांचा शिष्यपरिवार खूप वाढला होता. काशींत राहत असतांना त्यांना समजलें कीं, नर्मदेच्या परिसरांत माहिष्मती नगरींत मंडनमिश्र नांवाचा एक महापंडित राहत आहे. मंडनमिश्र हा कट्टा मीमांसक (वैदिक कर्मकांडाचा समर्थक) असून वादविवादांत कुणासहि हार न जाणारा होता. त्याची पत्नी सरस्वती हीहि गार्गी-मैत्रेयीसारखी महाविदुषी होती. आचार्यांनीं मनांत विचार केला कीं, मंडनमिश्रासारख्या महापंडिताला जर आपण आपलें मत पटवून देऊं शकलों, तर त्याच्याबरोबर त्याच्या मताचे अनेक लोक आपल्याला अनुकूल बनतील. हा विचार निश्चित होतांच आचार्य माहिष्मती नगरींत आले. गांवांत प्रवेश करतांच त्यांनीं पाणोठ्यावरच्या स्त्रियांना मंडनमिश्राच्या घराचा ठावठिकाणा विचारला. त्या स्त्रियांच्या समूहांत मंडनमिश्राच्या घरच्या दासीहि होत्या. त्यांनीं अस्खलित संस्कृत भाषेंत उत्तर दिलें :

"ज्या दारीं तत्त्वज्ञानांतील गूढ प्रश्नांची चर्चा राघू-मैना करीत असतात, तें घर मंडनमिश्राचें आहे, असें समजा."

आचार्य चकित झाले. ज्याच्या दारच्या राघू-मैना आणि दासदासीहि संस्कृत भाषेंत बोलतात, त्याचा ज्ञानाधिकार केवढा मोठा असेल ! आचार्य मंडनमिश्राचें घर

शोधीत आले. त्या दिवशीं मंडनमिश्राच्या घरीं श्राद्ध होतें. ब्राह्मण जेवायला बसले होते, सरस्वती त्यांना वाढीत होती आणि मंडनमिश्र त्यांना आग्रह करीत होते. इतक्यांत आचार्यांनीं गर्जना केली,

"ॐ भवति भिक्षां देहि !"

श्राद्धाच्या वेळीं संन्याशानें उपस्थित व्हावें, हें मंडन-मिश्राला रुचलें नाहीं. त्यानें संतापून विचारलें,

"डोकें तासलेल्या संन्याशा, कुठून उपस्थित झालास ?- कुतो मुंडी ?"

या उर्मट भाषेवरून आचार्यांनीं मंडनमिश्राची वृत्ति ओळखली आणि जशाच तसें वागण्याचें ठरविलें. 'कुतो मुंडी ?' (मुंडन केलेल्या प्राण्या, कुठून आलास ?) या प्रश्नाचा अर्थ 'कुठून मुंडन केलेंस ? असा करून त्यांनीं उत्तर दिलें—

"गळ्यापासून वर मुंडन केलें !—आ गलान् मुंडी !"

या विपरीत उत्तरानें मंडनमिश्र अधिकच भडकला—

"दारू प्यालास काय ?-सुरा पीता ?"

आचार्य मनोमन हंसले आणि "सुरा पीता" या प्रश्नाचा अर्थ "दारू पिवळी असते काय ?" असा घेऊन उत्तरले—

"नाहीं ! पांढरी असते ! -न ! श्वेता !"

आतां मात्र मंडनमिश्रानें ओळखलें कीं, हा तरुण संन्यासी केवळ भिक्षार्थी नाहीं. परंतु सरळ सरळ मान्यता देऊन सौजन्यानें वागेल तो पंडित कसला ! आचार्यांच्या उत्तरावर कडी करण्यासाठीं त्यानें विचारलें—

"तिचा रंग तुला माहोत आहे तर !–किं त्वं जानासि तद्वर्णम् ?"

आचार्य तत्काळ हंसत हंसत म्हणाले–

"होय !–मला रंग माहीत आहे आणि तुला रुचि !–अहं वर्णं भवान् रसः !"

आतां हें अर्थशून्य भांडण लांबविण्यांत अर्थ नाहीं, असें पाहून मंडनमिश्रानें विचारलें,

"तुला काय पाहिजे तें तरी सांग."

"वाद-भिक्षा !"

––मंडनमिश्र वादाला तयार झाला. त्या दोघांच्या वाग्युद्धाचें अध्यक्षस्थान सरस्वतोनें पत्करलें. वाद सुरू झाला.

मंडनमिश्राचा संताप अजूनहि शमला नव्हताच, त्यानें चिडून विचारलें,

"हे मूर्ख संन्याशा, एका गाढवालाहि ओझें होईल, एवढं भगवं वस्त्र अंगावर वागवतोस अन् शेंडीजानव्याचाच तुला भार होतो काय ?"

आचार्य या प्रश्नानें भडकले नाहींत. त्यांना मंडनमिश्राची कींव आली. ते शांतपणें एकेका शब्दावर जोर देऊन उत्तरलें,

"होय, मंडनमिश्रा, या भगव्या वस्त्राचं ओझं गाढवालाच काय, पण तुझ्या पितरांनाहि जड झालं ! तुझ्या पितरांपैकीं कुणीतरी संन्यास घेतला आहे का, बोल !"

"कशासाठीं ?"

"अरे, ज्या वैदिक धर्माचा तूं अभिमान बाळगतोस, त्या धर्माचं हृदय आज गुदमरून गेलं आहे. धर्माच्या नांवा-

खालीं सर्वत्र अधर्माचा नंगा नाच चालू आहे आणि तुमच्यासारखे वैदिक पंडित कर्मकांडांत आणि शुष्कवादांत धुंद आहेत, सर्वसंगपरित्याग करून, खऱ्या धर्माची ओळख करून देण्यासाठीं जिवाचा आटापिटा करणारे संन्यासी आज हवे आहेत ! बौद्ध भिक्षु-भिक्षुणींचे ते विहारांतील अनाचार, स्मशानांत राहून मद्यमांसाचें सेवन करणारे नि मनुष्यबळी देणारे ते क्रूर कापालिक—आणि आणखी असेच कितीतरी. धर्माची, धर्मग्रंथांची, धर्मक्षेत्रांची पायमल्ली चालू असतांना तुम्हांला सुखानं जगवतं तरी कसं ?"

आचार्यांच्या शब्दांत तळमळ होती, डोळ्यांत निश्चयाचें तेज होतें, मुखावर असामान्यतेची झळाळी होती. अनेक दिवस चाललेल्या चर्चेत मंडनमिश्र आणि सरस्वती हीं दोघेहि पराभूत झालीं आणि त्यांनीं आचार्यांचें अनुयायित्व पत्करलें. आचार्यांनीं मंडनमिश्राला संन्यास दिला आणि त्याचें नांव सुरेश्वराचार्य असें ठेवलें.

## ६ : धर्मसंस्थापनेचें कार्य

लोकांना धर्माचें खरें स्वरूप समजावून देण्यासाठीं आणि त्यांच्यांतील धर्मविरुद्ध आचार-विचारांचें उन्मूलन करण्यासाठीं आचार्यांनीं अनेक दिशांनीं प्रयत्न केले. त्यांच्या या अधर्म-निर्मुलनाच्या आणि धर्म-संस्थापनेच्या कार्यांत त्यांच्या ग्रंथरचनेचें महत्त्व विशेष आहे. कारण समाजांतील अनिष्ट प्रवृत्ति घालवून त्या जागीं इष्ट ती क्रांति घडवून आणण्यासाठीं प्रथम विचारांची पेरणी करावी लागते. योग्य विचारांचें बीज पेरलें गेलें कीं, हवें तें परि-

वर्तन घडून यायला वेळ लागत नाहीं. विचार-जागृतीचें हें महत्त्व ध्यानांत घेऊन आचार्यांनीं काशींत राहत असतांनाच अनेक ग्रंथ लिहिले.

त्यांच्या ग्रंथ-संभारांत 'प्रस्थानत्रयी'वरील भाष्यें प्रसिद्ध आहेत. 'प्रस्थानत्रयी' म्हणजे उपनिषदें, ब्रह्मसूत्रें आणि भगवद्गीता हे आपल्या धर्माचा मुख्य आधार असलेले तीन ग्रंथ. उपनिषदें हीं वेदवाङ्मयापैकींच असून, त्यांत भारतीय परंपरेंतील जुन्यांत जुन्या काळीं मांडले गेलेले अत्यंत श्रेष्ठ विचार आहेत. उपनिषदें म्हणजे निरनिराळ्या ऋषींच्या प्रतिभेंतून निर्माण झालेल्या स्फुट विचारांचीं संकलनें. ब्रह्मसूत्रांत महर्षि बादरायणांनीं उपनिषदांतील विचारांची संगति सूत्ररूपानें लावण्याचा प्रयत्न केला आहे आणि गीतेंत तर आपल्या सर्वश्रेष्ठ धर्मविचारांचें एकजीव रसायन आहे. उपनिषदें, ब्रह्मसूत्रें आणि गीता यांचें एवढें अनन्यसाधारण महत्त्व असल्यामुळें त्या ग्रंथांतील विचारांचें स्पष्टीकरण करणें हें महत्त्वाचें कार्य होतें. आचार्यांनीं हें कार्य केल्यामुळें भारतांतील पंडितांचें अनेक अपसमज दूर झाले आणि त्यांना वैदिक परंपरेंतील विचारांचें सुसंगत ज्ञान झालें. आचार्यांची संस्कृत भाषा अत्यंत सोपी, साधी आणि तर्कशुद्ध आहे. अत्यंत गहन तत्त्वविचारहि अत्यंत प्रसन्न शैलींत मांडून लोकांना समजावून देण्याची आचार्यांची हातोटी विलक्षण होती.

'प्रस्थानत्रयी'वरील या भाष्यांशिवाय सर्वसाधारण शिक्षितांसाठीं वैचारिक आणि भक्तिपर असें प्रचंड साहित्य आचार्यांनीं लिहिलें आहे. लहान-सहान तात्त्विक ग्रंथांवर

त्यांनीं पंचवीस-तीस सुलभ टीका लिहिल्या; धर्मविषयक विचारांचें सारसंकलन करण्यासाठीं पस्तीस-चाळीस प्रकरण-ग्रंथ लिहिले आणि शिव, विष्णु, देवी, गणेश इत्यादि देवतांच्या उपासकांसाठीं पन्नास-साठ अमृतमधुर स्तोत्रें रचलीं. त्यांचे प्रकरण-ग्रंथ आणि स्तोत्रें भारतांत सर्वसाधारण जाणत्या समाजांत अत्यंत प्रिय झालेलीं आहेत; तर त्यांचीं 'प्रस्तानत्रयी' वरील भाष्यें जगन्मान्यता पावलीं आहेत.

तर्कशुद्ध विचारसरणी आणि सुगम-सुरस भाषा यांमुळें त्यांच्या ग्रंथांनीं लोकमनाची पकड घेतली. प्रत्यक्ष वाद-विवाद करून त्यांनीं निरनिराळ्या मतांच्या बड्या पंडितांना आपले विचार पटवून दिलेच होते. मंडनमिश्राला आपला शिष्य बनविल्यावर आचार्यांनीं विचार-जागृती-साठीं भारत-भ्रमण सुरू केलें. या भ्रमणकाळांत त्यांनीं काशीपासून रामेश्वरापर्यंत आणि द्वारकेपासून जगन्नाथ-पुरीपर्यंत अनेक धर्मक्षेत्रें धुडाळलीं. सर्वसाधारण लोकांचें धर्मविचार शुद्ध बनविण्यासाठीं धर्मक्षेत्रांचें शुद्धीकरण झालें पाहिजे, या हेतूनें आचार्यांनीं सर्व महत्त्वाच्या धर्मक्षेत्रांत संचार केला आणि तेथील विकृत आचारविचारांच्या धर्म-पंथांचा व धर्मपंडितांचा संपूर्ण पराभव करून आपल्या विचारांचा पगडा त्यांच्यावर पाडला.

धर्मग्रंथ आणि धर्मक्षेत्रें यांना उजळा देण्याचें कार्य केल्यावर आचार्यांनीं आणखी एक विलक्षण योजना आंखली. ती योजना म्हणजे भारताच्या चारी दिशांना चार मठ स्थापून संन्याशांना संघबद्ध करणें. आपण चालविलेल्या कार्याला चिरस्थायी स्वरूप यायला हवें असेल आणि लोकांच्या

धर्मजीवनाला सतत इष्ट गति द्यावयाची असेल, तर विचारवंतांची आणि धर्मशिक्षकांची एक परंपरा चालू राहिली पाहिजे, त्यासाठीं सर्व स्वार्थावर पाणी सोडलेले आणि लोकांच्या भल्यासाठीं स्वतःला वाहून घेतलेले ध्येयशील संन्यासी हवेत. अर्थातच या सर्व संन्याशांना एका विचारांत–एका व्यवस्थेंत बांधणारी संस्थाहि हवी.

दक्षिणेस शृंगेरी येथें, पूर्वेस जगन्नाथपुरींत, उत्तरेस बदरिकाश्रमीं आणि पश्चिमेस द्वारका येथें असे चारी दिशांना चार मठ त्यांनीं निर्माण केले. शृंगेरी मठावर सुरेश्वराचार्य, जगन्नाथपुरीच्या मठावर पद्मनाभाचार्य बदरिकाश्रमीं तोटकाचार्य आणि द्वारका मठावर हस्तामलक असे चार शिष्य प्रमुख म्हणून नेमले गेले. या चार मठांच्या व्यवस्थेखालीं सर्व भारताच्या धार्मिक नियंत्रणाची व्यवस्था आंखून देण्यांत आली. संन्याशांचे तीर्थ, आश्रम, वन, अरण्य, गिरि, पर्वत, सागर, सरस्वती, भारती, पुरी असे दहा वर्ग बनवून ते या चार मठांना वांटून दिले. या दहा वर्गांतील संन्याशांना 'दशनामी संन्यासी' असें म्हणतात. संन्यासधर्माचा आदर्श स्वतः आचार्यांनींच घालून दिलेला असल्यामुळें या चार मठांतील व्यवस्था, कार्यपद्धति आणि संन्याशांचीं कर्तव्यें आचार्यांनीं कांटेकोरपणें निश्चित केलीं. बौद्ध भिक्षूंच्या संघटनेंतील सर्व वैशिष्टयें स्वीकारून, त्यांतील दोष आणि त्यांच्या ऱ्हासाला कारणीभूत झालेले विकृत आचार आपल्या परंपरेंत शिरणार नाहींत, याची दक्षताहि त्यांनीं घेतली.

## ७ : मातृभक्ति

आचार्य एके दिवशीं ध्यानस्थ बसले असतांना त्यांना जाणवलें कीं, आपली आई अंथरुणाला खिळली असून, मृत्यु तिच्याभोंवतीं घिरट्या घालीत आहे. आईचें स्मरण झाल्याबरोबर आचार्य तांतडीनें कालदीला आले. आई-जवळ येऊन पाहतात तों आई खरोखरच मृत्यूच्या दारीं उभी होती. त्यांनीं तिला वंदन केलें आणि जवळ बसून हाक मारली, "आई !"

जराजर्जर आर्याम्बेनें डोळे उघडले आणि पाहिलें तो समोर तिचा एकुलता एक पुत्र बसलेला ! तिच्या आश्चर्याला आणि आनंदाला पारावार राहिला नाहीं. अखेर-च्या क्षणीं का होईना, आपला पुत्र आपल्याजवळ आला, त्याच्या डोळ्यांदेखत आपला देह पडेल, त्याच्या हस्तें आपलें क्रियाकर्म पार पडेल, याचें त्या माउलीला समा-धान वाटलें. बाराव्या वर्षी घराबाहेर पडलेले किशोर शंकराचार्य आता एका तरुण आणि तेजस्वी संन्याशाच्या रूपानें आईजवळ बसलेले होते. त्यांची कीर्ति आईच्या कानीं गेलीच होती. पुत्रवियोगाची व्यथा साहणाऱ्या त्या एकाकी विधवेच्या जीवनांत पुत्रगौरवाच्या वार्ताच काय त्या सुखाचा विषय होत्या. पण आईचें हृदय एवढें मोठें असतें कीं, मुलाच्या विकासापुढें ती स्वतःचीं दुःखें विसरते आणि मुलाचें सुख तेंच आपलें सुख मानतें. आपल्या मुलाची कीर्ति साऱ्या भारतभर दुमदुमते आहे, लोकांच्या कल्याणासाठीं झटून तो आपलें नांव सार्थ करीत आहे,

याचा आर्याम्बेला आनंद होता, अभिमान होता. कीर्तीच्या कैलासावर आरूढ झालेला तिचा शंकर आज तिच्याजवळ आला होता. तिनें त्याच्या अंगावरून हात फिरवला, त्याला आनंदाश्रूंनीं न्हाऊं घातलें आणि गद्गद स्वरांत विचारलें—

"बाळ, तूं आलास ?"

"हो आई ! –तूं आठवण केलीस म्हणून धांवत आलों." आचार्यांच्या डोळ्यांत अश्रु तरारले.

आर्याम्बेचीं गात्रें क्षीण झालीं होतीं. पंचप्राण कंठांत अवघडले होते. बोलण्यांत कंप होता. परंतु आतां तिला मृत्यूची तमा नव्हती. आजवर तिला भीति होती ती एकाकीपणें मरण्याची. पण आतां मृत्युसमयीं आपला पुत्र जवळ आहे, या कल्पनेनें ती मृत्यूलाच हंसत होती.

आईची ती अवस्था पाहून आचार्यांनीं तिला विचारलें,

"आई, तुझी अखेरची इच्छा काय आहे ?"

"बाळ, तूं जवळ आहेस यांत मला सर्व कांहीं मिळालें आहे. तुझ्या हातून मला गति मिळावी अशी इच्छा होती, ती आज पूर्ण झाली."

आचार्यांनीं स्वतः प्राप्त केलेलें ज्ञान आईला सांगितलें. मुलाच्या मुखांतून स्रवणारी ज्ञानगंगा मातेच्या तनामनाला आनंद देत होती. त्या ज्ञानगंगेंत न्हात असतांनाच आर्याम्बेनें प्रसन्न मनानें देह सोडला. एवढे ज्ञानी आणि निग्रही आचार्य, पण आईच्या मृत्यूनें ते शोकगंभीर झाले.

त्यांनीं आईच्या अंत्य संस्कारांसाठीं बांधवांना बोलावलें, पण बांधव गोळा झाल्यावर 'और्ध्वदेहिक' कुणीं

करायचें, असा प्रश्न उपस्थित झाला. कारण आचार्य जरी आर्याम्बेचे पुत्र असले, तरी ते संन्यासी असल्यामुळें त्यांना तो अधिकार नव्हता.

आचार्यांनीं अर्थातच ही मर्यादा मानली नाहीं. आईला त्यानीं तसें आश्वासन दिलें होतें. त्यांचें मातेवर अपरंपार प्रेम होतें. बांधवांचीं बंधनें त्यांनीं मानलीं नाहींत. त्यामुळें सारे बांधव चिडून निघून गेले. आचार्यांनीं त्यांच्या बहिष्काराची तमा बाळगली नाहीं. स्वतःच्या घराच्या परसांतच त्यांनीं चिता रचली आणि एकटयानेंच आईचा देह उचलून आणून अग्निसंस्कार दिला. पुढील सर्व क्रियाकर्म त्यांनीं स्वतःच पार पाडलें. ही संन्याशाची सहृदयता आदरणीय आहे—अनुकरणीय आहे.

## ८ : दिग्विजय

काश्मीर प्रांतांतील एका शारदा-मंदिरांत एक सिंहासन होतें. त्या सिंहासनावर केवळ दिग्विजयी पंडितच बसूं शकत असे. त्या आसनावर बसल्याशिवाय 'जगद्गुरु' ही पदवी कुणालाहि प्राप्त होत नसे. त्या शारदा-मंदिराच्या चारी दिशांना चार द्वारें होतीं. आचार्यांच्या काळापर्यंत पूर्व, पश्चिम आणि उत्तर या तीन दिशांकडील दिग्विजयी पंडितांनीं त्या तीन दिशांचीं द्वारें उघडून 'जगद्गुरु' पदाचा बहुमान मिळविला होता, अर्थात् फार पूर्वी.

आचार्यांच्याविषयीं मनोमन नितांत आदर बाळगणाऱ्या वृद्ध पंडितांनीं त्यांना सुचविलें कीं—

"दक्षिण दिशेकडील द्वार उघडून आपण त्या सिंहासनावर बसावें आणि 'जगद्‌गुरु' बनावें."

"संन्याशानें सिंहासनावर कसें बसायचें ? मला तशी इच्छा नाहीं—शिवाय मला 'जगद्‌गुरु' म्हणून मिरवायचें नाहीं." आचार्यांनीं शुद्ध विनयानें उत्तर दिलें.

"तुमचें म्हणणें खरें आहे—परंतु तुमचा प्रभाव वर वर मानणारे, परंतु आंतून अहंकार अन् मत्सर बाळगणारे अनेक पंडित या देशांत आहेत. शारदा-मंदिरांतील सिंहासनावर बसणाऱ्या महापुरुषाविषयीं मात्र निरपवाद आदर बाळगण्याची परंपरा आहे. तुम्हांला आदर, कीर्ति, सन्मान हें कांहीं नको आहे, हें आम्ही जाणतों, परंतु तुमच्याविषयींचा निरपवाद आदर म्हणजेच तुमच्या विचारांविषयींची शुद्ध निष्ठा, असें आम्ही मानतों. कारण तुम्ही केवळ तत्त्वमूर्ति आहांत." वृद्धांनीं स्पष्टीकरण दिलें.

आचार्यांना वृद्धांचें हें म्हणणें पटलें. ते शिष्यांचा समूह बरोबर घेऊन काश्मीरकडे निघाले. गांवोगांवीं त्यांचें स्वागत होऊं लागलें. त्यांच्या जयजयकारानें आकाश निनादून गेलें. आचार्यांच्या दिग्विजय-यात्रेची वार्ता सर्वत्र पसरली. ज्यांच्या मनांत विरोध होता, मत्सर होता, ते पंडितहि अखेरचा प्रयत्न करण्यासाठीं काश्मीरकडे धांवले. त्यांनीं आपापसांत आचार्यांचा उपहास सुरू केला.

"अहो, हें काय विपरीत ?"

"पहा ना, म्हणे संन्यासी सिंहासनावर बसणार !"

"आतां याचा 'सर्वसंगपरित्याग' कुठें गेला ?"

"तो आतां गंगेला मिळाला !"

"मोहगंगा म्हणा मोहगंगा ! –सिंहासनावर बसण्याच्या लालसेपायीं यानें संन्यासधर्महि गुंडाळून ठेवलाय् !"

"आपण सर्वांनीं याला रोखलें पाहिजे."

"अहो, सर्व मिळून चांगलीच जिरवूं याची !"

आचार्य काश्मिरांत पोंचण्यापूर्वींच तिथें विरोधकांचा तळ पडला होता. काश्मिरी लोकांनीं मात्र आचार्यांचें सहर्ष स्वागत केलें. सिंहासनावर बसण्याची वेळ निश्चित झाली. आचार्य दक्षिण द्वाराच्या दिशेनें निघाले. त्यांच्या मुखावर विलक्षण तेज झळाळत होतें. इतक्यांत जमलेल्या घोळक्यांतून एक जण ओरडला.

"थांब, उद्दाम संन्याशा, चाललास कुठें ?"

आचार्य थांबले आणि शांतपणें म्हणाले,

"संन्यासी उद्दाम कसा असेल ? तसा तो असेल तर त्याला भगवीं वस्त्रें वापरण्याचा अधिकारच नाहीं. मी सिंहासनाकडे चाललों आहें, तो शारदेचा–ज्ञानाचा एक नम्र उपासक म्हणून !"

"असें होय. अरे पण तूं संन्यासी आहेस ना ? मग संन्याशाला सिंहासनाचा काय अधिकार ?"

"हें सिंहासन राजसत्तेचें नाहीं, शारदेचें आहे. शारदेच्या उपासकाला यावर बसण्याचा अधिकार आहे. शारदेच्या उपासनेंतला माझा अधिकार सिद्ध करायला मी तयार आहें."

आचार्यांच्या ज्ञानाधिकाराची आणि वादकौशल्याची कल्पना असणाऱ्या बऱ्याच पंडितांनीं आतां माघार घ्यायला सुरुवात केली. जे कांहीं वादाला प्रवृत्त झाले, त्यांना आचार्यांच्या प्रखर प्रज्ञेसमोर हार खावी लागली. आचार्य शारदा-मंदिराचा दक्षिण दरवाजा उघडून आंत गेले आणि शारदेला प्रणाम करून त्या श्रेष्ठ सिंहासनावर आरूढ झाले. साऱ्या जनसमूहानें त्यांचा जयजयकार केला. शंकराचार्य जगद्गुरु झाले.

त्यानंतर लौकरच आचार्यांनीं आपलें अवतारकार्य संपविलें. इ. स. ८१२ मध्यें बदरिकाश्रमीं वयाच्या बत्तिसाव्या वर्षी त्यांनीं कृतार्थ मनानें समाधि स्वीकारली. जणुं अधर्माचें हलाहल पिण्यासाठीं आणि धर्माला संजीवन देण्यासाठीं अवतरलेला शिव-शंकरच कैलासावर निजस्वरूपीं विलीन झाला !

## ९ : युगप्रवर्तक महापुरुष

शंकराचार्यांचें व्यक्तिमत्त्व महान् होतें, पांडित्य असामान्य होतें, चरित्र उदात्त होतें आणि काव्यप्रतिभा अप्रतिम होती. त्यांचें जीवन आदर्श गुणांनीं परिपूर्ण होतें. त्यांच्या संपर्कांत आलेल्या सर्व व्यक्तींना त्यांनीं उचित रीतीनें वागविलें. माता आणि गुरु यांच्यावर उत्कट भक्ति, शिष्यांवर अनुपम प्रेम, भक्तांविषयीं क्षमाशील वृत्ति, इत्यादि अनेक सद्गुणांचा समन्वय त्यांच्या ठायीं दिसतो. यांपैकीं एकेका गुणानेंहि माणसाला मोठेपण प्राप्त होऊं शकेल. ते पितृसुखाला बालपणींच आंचवले होते, परंतु

मातेविषयीं त्यांच्या मनांत नितांत भक्तिभाव नांदत होता. संन्यास घेण्याची तीव्र इच्छा मनांत दाटलेली असतांनाहि त्यांनीं आईच्या इच्छेविरुद्ध संन्यास घेतला नाहीं. संन्यास-ग्रहणांत आपल्या जीवनकार्याचें यश आहे, याची खात्री असूनहि आईनें अनुज्ञा देईपर्यंत त्यांनीं तो मार्ग पत्करला नाहीं. आईच्या मृत्यूच्या वेळीं उपस्थित राहण्याची प्रतिज्ञा त्यांनीं पाळली; एवढेंच नव्हे तर संन्यासी असूनहि त्यांनीं स्वतः आईचे अंत्यसंस्कार पार पाडले. या त्यांच्या वर्तनामुळें त्यांनीं आपल्या ज्ञातिबांधवांचा तिरस्कार सहन केला, परंतु त्यांनीं मातृभक्ति सांभाळली. आचार्यांची ही मातृभक्ति भारतांत आदर्शभूत आहे.

श्रीशंकराचार्य ही भारताच्या इतिहासांतील एक दिव्य विभूति आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रकाश आजहि दाही दिशांना उजळीत आहे. एक हजार वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या या महापुरुषाच्या कीर्तीचें चांदणें भारताच्या विचारगगनांत आजहि शोभत आहे. वैदिक धर्माच्या इतिहासांत शंकराचार्यांनीं एक नवें उज्ज्वल युग सुरू केलें. ज्या वेळीं हा पवित्र भारत अवैदिक परंपरांच्या विकृत-आचार-विचारांत फसला होता, ज्या वेळीं संयमहीन जीवनाची सैतानी क्रीडा सर्व भारतांत पसरली होती, ज्या वेळीं निष्क्रियता आणि उदासीनता समाजहृदयाला ग्रासून राहिली होती, त्या वेळीं शंकराचार्यांचा उदय झाला. खऱ्या धर्माची ज्योति दंभ आणि अनाचार यांच्या झंझावातांत विझून जाण्याची वेळ आली असतांना शंकराचार्यांनीं त्या

ज्योतीला आपल्या कर्तृत्वाच्या छत्राखालीं सांभाळलें आणि तिचें तेज शतपटींनीं वाढविलें. त्यांच्या कार्यानें वैदिक धर्माचा हृदयध्वनि गगनभेदी बनला. उपनिषदांची दिव्य वाणी साऱ्या देशांत घुमूं लागली, गीतेंतील ज्ञान लोकांसमोर आलें. ज्ञानाचा महिमा वाढला, धार्मिक उदासीनतेचा लोप झाला.

卐 卐 卐

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
क्र. ९२७८ दि. २०।५।८९
विषय व्या. वा
BVBK-0401247

# कांहीं तरी नवेंच करा

जीवनाची ठराविक चाकोरी सोडून–'कांहीं तरी नवेंच' करण्याची ईर्षा बाळगली आणि तत्सिद्ध्यर्थ विशिष्ट जीवनक्षेत्रांत अलौकिक कर्तृत्व केलें अशांची चरित्रें.

तीस मिनिटांत वाचून होणारीं पुस्तकें : शालेय-वर्गग्रंथालयासाठीं योजना

१. असा असतो देशभक्त : कोतवाल
२. गुलाम बंड करतो : स्पार्टकस
३. रा. शिक्षणाचा व्यास : विजापूरकर
४. कादंबरीकार हरीभाऊ : आपटे
५. मराठी नटसम्राट : गण. जोशी
६. व्यायाम भीष्माचार्य : माणिकराव
७. लष्करी संघटक : फ. लॉरेन्स
८. अलौकिक शिल्पकार : एंजलो
९. चित्रपट महर्षि : दादासाहेब फाळके
१०. इतिहासाचार्य राजवाडे : राजवाडे
११. दीनजनांची माउली : फाय
१२. देशासाठीं दर्यापार : जेम्स कुक
१३. वीरबाला झोया : ( रशिया )
१४. बहादूर शिकारी : जिम कॉर्बेट
१५. कोई बी चीज उठाव : फुलचंद
१६. वीरपत्नी राणी दुर्गावती :
१७. विख्यात वकील : बॅ. जयकर
१८. विलक्षण वार्ताहर : अर्नेस्ट पाइल
१९. भारतीय चित्रकार : रविवर्मा
२०. मराठी मुद्रण-प्राणदाता : जावजी
२१. राजमाता जीजाबाई
२२. स्वदेशी कारखानदार : धंताजी काळे
२३. भव्य स्थापत्य : फर्डिनांड द लेसेप्स
२४. सर्कस बहाद्दर : विष्णुपंत छत्रे
२५. भक्तिवेडी बहिणा : बहिणाबाई
२६. सद्गुणी बनण्याची कला : फ्रँकलिन
२७. भारत-कवि टागोर : रवींद्रनाथ
२८. कोशकार केतकर : डॉ. केतकर
२९. कृषिपंडित : दादासाहेब दोंदेकर
३०. सदा खेळाडू : पी. बाळू
३१. चिरंजीव मरण : मदनलाल धिंग्रा
३२. विमामहर्षि : अण्णासाहेब चिरमुले
३३. तेजस्वी धर्मोद्धारक : शंकराचार्य
३४. बंडखोर लोककवि : अनंत फंदी
३५. साकार संगीत : पं. पलुस्करबुवा
३६. साहसी वैमानिक : सँटा ड्युमाँ
३७. दर्याचा राजा : कान्होजी आंग्रे
३८. जमिनीचा जादूगार : डॉ. कार्व्हर
३९. लाखोंचा प्राणदाता : लुई पाश्चर
४० शिक्षण-भगीरथ : भाऊराव पाटील
४१. मराठी-मुद्रक : गणपत कृष्णाजी
४२. बर्फातला माणूस : हिलरी
४३. प्राणावरचा प्रवास : शिफले
४४. दानशूर कुबेर : रॉकफेलर
४५. प्रवासी पंडित : ह्युएनत्संग
४६. नृपनिर्माता : आर्य चाणक्य
४७. असामान्य क्रिकेटपटू : ब्रॅडमन
४८. लोकहिताचा संरक्षक : वि. पटेल
४९. पहिला मिशनरी : गजाननराव वैद्य
५०. तुम्हांला कोण व्हावेंसें वाटतें ?

प्रत्येक पुस्तक पन्नास नये पैसे : संच पेटी रु. २५.

वोरा ॲण्ड [illegible] पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.